श्री जे. पी. गुप्ता, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय

रा. भा. क्र. ५२/एनएपी-३४/९९-२०००
मौजा - उर्जानगर
तह. जिल्हा- चंद्रपूर

वाचा : उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचे प्र.क्र. ५३/एनएपी-३४/९९-२००० मौजा उर्जानगर

## आ दे श

[पारित दिनांक ५ जून २०००]

अर्जदार श्री शशीकुमार लक्ष्मीचंद जैन रा. देवई गोविंदपुर तुकूम येथील सर्व्हे नंबर जुना ३२१/२ व नविन १२/१ आराजी १.२१ हे.आर. निवास प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी दिलेल्या अभिन्यासात तांत्रीक अडचणी असल्यामुळे सुधारित अभिन्यास मंजुर करण्यापुर्वी सादर केलेल्या अर्जावर उप विभागीय अधिकारी चंद्रपूर यांचेकडे चौकशी करुन प्रकरण अहवालासह ह्या कार्यालयात प्राप्त झाले.

अर्जदारांनी मंजुर अभिन्यास आणि सुधारित अभिन्यासाची प्रत प्रकरणांत सादर केली. सुधारित अभिन्यास नगर रचनाकार, चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र क्र. अकृषी/उर्जानगर/सर्व/५०३ दिनांक २४-४-२००० अन्वये सुधारित अभिन्यास मंजुर केला आहे.

तसेच मंजुर अभिन्यास आणि सुधारित अभिन्यास यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

| जागेचे विवरण | मंजुर अभिन्यास | सुधारित अभिन्यास |
|---|---|---|
| १] भुखंडातील क्षेत्रफळ चौ. मि. | ६८३०,८१६ | ७१७१.०१० |
| २] खुल्या जागेचे क्षेत्रफळ चौ. मि. | १४४१.१४ | १२९९.०६ |
| ३] रस्त्याखालील क्षेत्र चौ. मि. | ३८२८.०४४ | ३६२९.९३ |
| ४] एकुण क्षेत्रफळ | १२१००.००० | १२१००.०० |

वरील सर्व बाबींचा विचार करुन तसेच उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर यांनी शिफारस केल्यानुसार सुधारित अभिन्यास मंजुर करण्यांस हरकत दिसत नाही. करिता महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार मौजा देवाई गोविंदपुर तुकूम येथील सर्व्हे नंबर जुना ३२१/२ व नविन १२/१ आराजी १.२१ हे.आर. परावर्तीत

जागेचा सुधारित अभिन्यास अर्जदार श्री शशीकुमार लक्ष्मीचंद जैन यांच्या उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते. परवानगी खालील अटी व शर्ती नमूद केल्याप्रमाणे राहील.

अटी :१] ही परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ व तदन्वये केलेले नियम यांच्या उपबंधाच्या अधिन राहील.

२] उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचे मुळ प्रकरण क्रमांक ११२/एनएपी ३४/८०-८१ मध्ये नमूद आदेशातील सर्व अटी लागु राहतील. निवास प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर करता येणार नाही.

३] मुळ प्रकरणातील मंजुर अभिन्यास रद्द करण्यांत आला असुन या आदेशाची नोंद प्र.क्र.११२/एनएपी-३४/८०-८१ मध्ये घेण्यांत यावी.

४] अर्जदाराला सर्व्हे नंबर जुना ३२१/२ व नविन १२/१ आराजी १.२१ हे.आर.[७१७१.०१०चौ.मि.] ला ०.०७ पैसे प्रति चौ.मि.प्रमाणे ५०२/- [रु. पाचशे दोन फक्त] अकृषिक सारा नियमानुसार प्रतिवर्ष सरकार जमा करावा लागेल.

५] अकृषिक सारा-याचे दर शासनाकडुन प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे सुधारित अकृषिक सारा व फरकाची रक्कम जमा करावी लागेल.

६] या पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन झाल्यास उक्त जमीन महसुल अधिनियमाच्या उपबंधान्वये घालुन दिलेल्या शिक्षेस पात्र राहील.

सवा/-
[जे.पी.गुप्ता]
जिल्हाधिकारी, चंद्रपूर

१] प्रतिलीपी उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर यांना त्यांचे पत्र क्र.५३/एनएपी ३४/९९-२००० सह आदेश व सुधारित अभिन्यास उचित कार्यवाहीस अग्रेषित.

२] प्रतिलीपी श्री शशीकुमार लक्ष्मीचंद जैन रा.दे.गो.तु.चंद्रपूर यांना माहीतीस अग्रेषित.

३] प्रतिलीपी तलाठी ऊर्जानगर/मुख्याधिकारी न.प.चंद्रपूर यांना माहीतीस अग्रेषित.

True Copy
नायब तहसिलदार
चंद्रपूर
23/5/2018

जिल्हाधिकारी, चंद्रपूर करिता